# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 27/11/2019 (बुधवार)
# (दुपार)

---

## अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावरील मौजा मेंढला येथे दिनांक 11/11/2019 चे 11:00 वा. दरम्यान सौ. मोनिका रेवनाथ सातपुते(मृतक), वय 42 वर्ष, रा. मेंढला, ता. नरखेड यांना घरच्याच गाईने डावे पायाच्या मांडीला सिंग मारल्याने त्या जखमी झाल्या. मोनिका सातपुते यांना उपचाराकामी प्रथम पि.एस.सी मेंढला व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता डॉक्टरांनी तपासून 15.50 वा. मृत घोषीत केले. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा विकास बेलसरे, मेडीकल पोलिस बुथ, नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे कलम 174 जाफौ कायद्यान्वये मर्ग नोंद करण्यात आलेला आहे. पुढील तपास पोलिस शिपाई शरद घेरमाडे हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 02 कि.मी. अंतरावरील मौजा फेटरी येथे दिनांक 19/11/2019 चे 18:00 वा. दरम्यान भाऊराव दौलतराव भोयर(मृतक), वय 71 वर्ष, रा. फेटरी हे घरासमोर गाई बांधत असतांना दुसऱ्या गाईने मागुन जोराचा धक्का दिल्याने ते सिमेंट रोडवर खाली पडले. त्यांच्या छातीला मुका मार लागल्याने त्यांना उपचाराकामी प्रथम पीएचसी काटोल व नंतर मेडीकल कॉलेज, नागपुर येथे भरती केले असता दि 20/11/2019 चे 09.00 वा. त्यांचा मृत्यू झाला. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा विकास बेलसरे, मेडीकल पोलिस बुथ, नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ कायद्यान्वये मर्ग नोंद करण्यात आलेला आहे. पुढील तपास पोलिस नाईक संतोष आंधळे हे करीत आहे.

## सर्पदंशामुळे मृत्यु

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 15 कि. मी. अंतरावर मौजा सोनखांब शिवार येथे दिनांक 21/11/2019 चे 12.25 वा. दरम्यान सुनिल श्रावनजी तलवे, वय 40 वर्ष, रा. सोनखांब हे स्वतःच्या शेतात काम करीत होते. दरम्यान अचानक त्यांच्या उजव्या पायाचे पौचाला सापाने चावा घेतला. त्यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकामी प्रथम सरकारी दवाखाना कळमेश्वर व नंतर मेयो हॉस्पीटल, नागपूर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान 22/11/19 चे 10.00 वा. त्यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– संजय श्रावन तवले, वय 42 वर्ष, सोनखांब यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस नाईक संतोष आंधळे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर